तृतीयपंथीयांच्या स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना राबविण्यास मान्यता देणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**शासन निर्णय क्रमांक तृतीय-२०२०/प्र.क्र.२८७/सामासु,**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- १३ मार्च, २०२६**

वाचा :-

१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक तृतीय-२०१८/ प्र.क्र.२६/ सामासु, दिनांक ७/१०/२०१८

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक तृतीय-२०१८/ प्र.क्र.२६/ सामासु, दिनांक १३/१२/२०१८

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक तृतीय-२०१८/ प्र.क्र.२६/ सामासु, दिनांक ८/०६/२०२०

४) आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्रमांक सकाअ/ मावक /तृतियपंथीय /बीजभांडवल / योजना/२०२०-२१/का-१२/१७९,दि.९ मार्च,२०२१.

५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक तृतीय-२०२३/ प्र.क्र.१२२/ सामासु, दिनांक ११ मार्च, २०२४.

६) आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्रमांक सकाअ/मावक/तृतियपंथीय /बीजभांडवल / २०२३-२४/का-१२/१७९,दि.०२ फेब्रुवारी, २०२४.

७) आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्रमांक सकाअ/मावक/तृतियपंथीय /बीजभांडवल / २०२३-२४/का-१२/१७९,दि.०२ फेब्रुवारी, २०२४.

८) आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्रमांक सकाअ/मावक/तृतियपंथीय /बीजभांडवल / २०२५-२६/का-१२/२३४४,दि.१७ सप्टेंबर,२०२५.

प्रस्तावना :-

राज्यातील तृतीयपंथीय घटकांतील व्यक्तींची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणले जावे, याकरिता, तसेच या समाज घटकांच्या समस्या बहुतांश विभिन्न स्वरुपाच्या असल्यामुळे शासनाचे विविध विभाग व या क्षेत्रातील कार्यरत नामांकित व्यक्तीचे मिळून त्यांच्या विकासाकरिता तृतीयपंथीय कल्याण मंडळ रुपाने स्वतंत्र कल्याणकारी उपाययोजनात्मक यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासन निर्णय, दिनांक १३ डिसेंबर, २०१८ अन्वये राज्यस्तरीय व प्रादेशिक आणि जिल्हास्तरीय तृतीयपंथीय यांचे संरक्षण व कल्याण मंडळे आणि दि.०७.१०.२०२० अन्वये जिल्हास्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि.११ मार्च,२०२४ च्या शासननिर्णयान्वये तृतीयपंथीयासाठी सर्वकष धोरण घोषित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार सर्व विभागाच्या योजना पात्र तृतीयपंथीयांना निकषानुसार लागू करण्यात आल्या आहेत. यास्तव राज्यातील तृतीयपंथीयांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्याच्या

अनुषंगाने स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देवून त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी राज्यात बीज भांडवल योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. **बीज भांडवल योजनेचे स्वरुप :-**

I) महाराष्ट्र राज्यातील किमान दहा वर्ष वास्तव्य असलेल्या तृतीयपंथीय या घटकातील व्यक्तींना त्यांचेकडे असलेले कौशल्य व अप्रशिक्षीत व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देवून त्यांना शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने तृतीयपंथीय व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेंतर्गत राष्ट्रीयकृत बँकांमार्फत छोट्या व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी सदर योजना राबविण्यात येईल.

II) प्रस्तुत योजनेतंर्गत अप्रशिक्षित तृतीयपंथीय व्यक्तींना प्रामुख्याने खालील व यासारखे इतर लघु व्यवसायांसाठी बीजभांडवल योजनेंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) भाजी स्टॉल | (२) चहा / स्नॅक्स सेंटर | (३) झेरॉक्स/ लॅमिनेशन सेंटर |
| (४) फ्रुट स्टॉल | (५) पिठाची गिरणी | (६) कापडी पिशव्या तयार करणे. |
| (७) जनरल स्टोअर्स | (८) स्टेशनरी शॉप | (९) मिनी माल वाहतूक टेम्पो |
| (१०) पिठाची गिरणी | (११) आईसक्रिम फॅक्टरी | (१२) वडा-पाव/ ज्युस सेंटर |
| (१३) बेकरी व्यवसाय | (१४) बांगडी दुकान | (१५) बटाटा वेफर्स बनविणे |
| (१६) ब्युटी पार्लर | (१७) सलून | (१८) चिकन / मासे विक्री केंद्र |
| (१९) मोबाईल शॉपी | (२०) मसाले तयार करणे. | (२१) लॉंड्री / धोबी व्यवसाय |

III) प्रशिक्षीत असल्यास तृतीयपंथीय लाभार्थ्यांना खालील व यासारख्या इतर व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे तसेच अप्रशिक्षीत तृतीयपंथीय व्यक्तींना व्यवसायाचे प्रशिक्षण विभागांमार्फत देऊन त्याकरीता आवश्यक साधने संच (Tool Kit) साठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| (१) प्लंबर | (२) फ्रिज दुरुस्ती | (३) इलेक्ट्रिशियन |
| (४) टि. व्ही दुरुस्ती | (५) मोबाईल दुरुस्ती | (६) स्मार्ट खेळणी तयार करणे |
| (७) ए.सी. दुरुस्ती | (८) गॅस शेगडी दुरुस्ती | (९) घरगूती उपकरणे दुरुस्ती |
| १०) वॉटर हिटर दुरुस्ती | ११) गिझर दुरुस्ती | १२) वॉटर फिल्टर दुरुस्ती |

०३. **कर्जाचे प्रकार :-**

प्रस्तुत योजनेतंर्गत तृतीयपंथी लाभार्थ्यांस खालीलपैकी कोणतेही एक कर्ज अनुज्ञेय राहील.

१. **लघु कर्ज योजना** - रुपये २५,०००/- पर्यंत(लाभार्थी हिस्सा ५ टक्के, ४५ टक्के शासन अनुदान व ५० टक्के राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज)

२. **मध्यम कर्ज योजना**- रुपये ५०,०००/- पर्यंत (लाभार्थी हिस्सा ५ टक्के, ४५ टक्के शासन अनुदान व ५० टक्के राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज)

३. **दीर्घ कर्ज योजना**- रुपये २,००,०००/- पर्यंत (लाभार्थी हिस्सा ५ टक्के, ४५ टक्के शासन अनुदान व ५० टक्के राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज)

०४. **बीज भांडवल योजनेची वैशिष्टे :-**

१. राज्यातील तृतीयपंथीय व्यक्तींना स्वयंरोजगार व व्यवसायाची संधी उपलब्ध करुन देणे.

२. व्यक्तींना लघुउद्योगासाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करुन देणे.

३. सदरची योजना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबविली जाईल.

४. सदर योजनेअंतर्गत तृतीयपंथीय लाभार्थ्यांसाठी कौशल्य/ व्यवसाय विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येईल.

५. सदर योजनेंतर्गत लाभार्थी हिस्सा ५ टक्के, ४५ टक्के शासन अनुदान व ५० टक्के राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज, ह्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येईल. (सदर योजनेंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या कर्जावरील व्याज दर (Rate of Interest) संबंधित बँकेच्या अंतर्गत नियमन व रिझर्व्ह बँक (RBI) कडून निश्चित केलेल्या धोरणांप्रमाणे राहील.)

६. सदर योजनेंतर्गत नियमित कर्ज फेडणाऱ्या लाभार्थ्यास व्याजावर ३ टक्के रिबेट(सुट) देण्यात येईल.

०५. **बीज भांडवल योजनेसाठी लाभार्थ्याचे पात्रता निकष :-**

१. लाभार्थी हा तृतीयपंथी व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी किमान १० वर्षे असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२. सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. लाभार्थी हा १८ ते ५० या वयोगटातील व्यवसाय करण्यासाठी सक्षम असावा.

४. बीज भांडवल योजनेंतर्गत कर्जदारास कोणत्याही प्रकारच्या जामीनदाराची गरज नाही.

५. कोणत्याही प्रकारचे तारण (मॉर्गेज) ठेवावे लागणार नाही.

६. लाभार्थ्यांने अर्ज करतेवेळी यापूर्वी इतर कोणत्याही बीज भांडवल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

७. तृतीयपंथीय लाभार्थ्याने व्यवसायासाठी कौशल्य असल्यास नमूद करणे आवश्यक आहे.

०६. **बीज भांडवल योजनेंतर्गत कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे :-**

१. महाराष्ट्र राज्यात किमान १० वर्षे वास्तव्य केले असल्याचे अधिवास प्रमाणपत्र.

२. सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले ओळखपत्र.

३. वास्तवाकरिता पुरावा मतदान ओळखपत्र/आधार कार्ड/पॅनकार्ड/रेशनकार्ड/लाईट बील/ घराची टॅक्स पावती/भाडे करारपत्र इत्यादी

४. लाभार्थी जो व्यवसाय करणार आहे किंवा करत असल्यास त्याचा परवाना व स्थायी पत्ता.

५. व्यवसायासाठी लागणारी सामुग्री किंवा यंत्र सामुग्री इत्यादीचे कोटेशन व बिले.

६. व्यवसाय ज्या ठिकाणी करणार आहे त्या जागेचा ७/१२ उतारा/ प्रकल्पासाठी जागा भाडे तत्वावर घेणार असल्यास भाडेकरारनामा. **(परिशिष्ट-ब)**

७. व्यवसायाच्या जागेचे ठिकाण भाडेकराराने असल्यास जागा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र.

८. स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र.

९. लाभार्थ्याने ज्या प्रयोजनासाठी कर्ज घेतले आहे, त्याच प्रयोजनासाठी उपयोग करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

१०. अर्जदाराचे २ फोटो.

०७. **बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याची पध्दती :-**

तृतीयपंथीय लाभार्थ्यांने शासनाने विहीत केलेल्या नमुन्यामधील अर्ज व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडल्याची पुर्ण खात्री करुन परिपुर्ण अर्ज सक्षम प्रधिकारी व संबंधीत जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील. **(विहीत नमुन्यातील अर्ज-परिशिष्ट-अ)**

०८. **बीजभांडवल योजनेची कार्यपध्दती:-**

तृतीयपंथीय लाभार्थ्यांसाठी राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज मंजूर करण्याबाबत शासनामार्फत सदर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकारी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेमार्फत जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेनंतर कर्ज मंजूरीबाबत बँकेस शिफारस करण्यात येईल. सदर कर्ज मंजूरी नंतर शासन अनुदानासाठी संबंधित जिल्हाचे सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण यांच्या शिफारशीनुसार आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावेत.

०९. **बीज भांडवल कर्जाची परतफेड :-**

तृतीयपंथीय लाभार्थ्यांना बीज भांडवल योजनेंतर्गत राष्ट्रीयकृत बँकांकडून उपलब्ध करुन दिलेले कर्जाचे हप्ते नियमानुसार विहीत मुदतीत भरणे बंधनकारक राहील.

१०. **बीज भांडवल योजनेंतर्गत कर्जाची वसूली :-**

तृतीयपंथीयांना बीज भांडवल योजनेंतर्गत राष्ट्रीयकृत बॅकांनी कर्जदारास दिलेल्या कर्जाची वसूली बँकेच्या नियमानुसार करावी. याबाबत कर्ज वसूलीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

११. प्रस्तुत योजनेचा लाभ घेण्याच्या अनुषंगाने तृतीयपंथी लाभार्थ्यांकरिता कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत घेण्यासाठी सविस्तर प्रशिक्षण आराखडा तयार करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आर्थिक भारासह NSQF aligned असलेले Short Term Training अभ्यासक्रम राबविण्याचा प्रस्ताव तयार करुन तो सामाजिक न्याय विभागास सादर करतील.

१२. तृतीयपंथी घटकातील व्यक्तींना वरील मुद्दा क्र.०२(ड) मधील योजनांचा बीज भांडवल योजनव्दारे लाभ देताना कौशल्य विकास प्रशिक्षण व उद्योजकता विकास प्रशिक्षण देणे अनिवार्य राहील.

१३. व्यवसायाची देण्यात आलेली यादी ही केवळ दिशादर्शक असून आयुक्त समाजकल्याण पुणे यांच्या शिफारशीनुसार लाभार्थ्यांच्या यादीत वाढ/ घट करण्याचा अधिकार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास राहील.

१४. कौशल्य विकास प्रशिक्षण करीता बीज भांडवल (Seed Capital) योजनेतंर्गत तृतीयपंथीयांच्या सामाजिक पर्याय (Community Option) सहकारी संस्था (Cooperative Society) किंवा कार्यगट (Working Groups) जसे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यात आल्यास त्यांनाही सदर योजनेचा एकत्रित लाभ देता येईल.

१५. सदर योजनेतंर्गत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी खालील राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री (सामाजिक न्याय) | अध्यक्ष |
| २. | मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) | उपाध्यक्ष |
| ३. | प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ४. | सहउपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ५. | उप सचिव (सामासु), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ६. | २ तृतीयपंथीय अशासकीय सदस्य | सदस्य |
| ७. | आयुक्त, समाजकल्याण, पुणे | सदस्य सचिव |

१६. सदर योजना राबविण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | आयुक्त, समाजकल्याण, पुणे | अध्यक्ष |
| २. | उपायुक्त (नाहसं), समाजकल्याण आयुक्तालय, पुणे | सदस्य |
| ३. | संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण | सदस्य |
| ४. | संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य सचिव |

१७. सदर योजनेतंर्गत लाभार्थ्यांची निवड व पर्यवेक्षण पुढील जिल्हास्तरीय समितीकडून करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **समितीतील पदनाम** |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | जिल्हा कोषागार अधिकारी | सदस्य |
| ४. | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी | सदस्य |
| ५. | प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था | सदस्य |
| ६. | कौशल्य विकास अधिकारी | सदस्य |
| ७. | सहायक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य सचिव |

वरील सर्व समित्यांमध्ये आवश्यकतेनुसार संबधित विभागांच्या अधिकाऱ्यांना निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करता येईल.

१८. बीज भांडवल योजनेंतर्गत प्रति जिल्हा लाभार्थी संख्या २५ इतका लक्षांक निश्चित करण्यात येत असून सदर लक्षांक हा जिल्ह्यातील तृतीयपंथीयांच्या संख्येनुसार निश्चित करण्यात यावा. सद्य:स्थितीत सदर योजनेसाठी पहिल्या टप्प्यात लाभार्थी संख्या साधारणपणे १००० प्रतिवर्षी इतकी निश्चित करण्यात येत आहे. सदर लाभार्थ्यांच्या यादीत वाढ/ घट करण्याचा अधिकार आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या शिफारशीनुसार शासनास राहील.

१९. सदर योजनेच्या माहितीसाठी समाजकल्याण आयुक्तालय, पुणे येथे मदत कक्ष (Help Desk) स्थापन करण्यात येईल.

२०. सदर बीज भांडवल योजनेतंर्गत पोर्टल, प्रशिक्षण, जाहिरात, प्रचार व प्रसिध्दी तसेच इतर प्रशासकीय खर्चासाठी अर्थसंकल्पित निधीच्या ५ टक्के निधीची तरतूद करण्यात येत आहे.

२१. सदर योजनेकरिता मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण (०२) तृतीयपंथीयांचे कल्याण, (०२) (०१) तृतीयपंथीयांचे कल्याण व हक्कांचे संरक्षण करण्यासाठी तृतीयपंथीयांच्या कल्याण मंडळाची स्थापना (कार्यक्रम), (२२३५ सी १९९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातुन भागविण्यात येईल.

२२. सदर योजनेसाठी आयुक्त, समाजकल्याण पुणे हे “नियंत्रक अधिकारी” राहतील. तसेच सहायक आयुक्त, संबधित जिल्हा “आहरण व संवितरण अधिकारी” यांना अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२३. सदर शासन निर्णय, मा.मंत्रिमंडळाच्या दि.२२ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

२४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक साकेतांक २०२६०३१३१५३३१९८३२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

सोबत:- परिशिष्ट “अ” व”ब”

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA,
2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43
D79D224, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6EC
A0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.03.13 15:34:22 +05'30'

**(विवेक शिंदे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास/ गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उप मुख्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास/ क्रीडा व युवक कल्याण/ रा.ऊ.शु.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई,
५. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव,
६. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव,
७. मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
९. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद/ विधानसभा,
१०. सर्व मा.सन्माननीय संसद सदस्य,
११. सर्व मा.विधानपरिषद/ विधानसभा सदस्य,
१२. सह उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१५. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर,
१७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१९. सर्व विभागीय आयुक्त,
२०. सर्व जिल्हाधिकारी,
२१. सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. उप सचिव (सामासु), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,
२५. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्या. मुंबई,

२६. व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई,
२७. व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मद्योग विकास महामंडळ मर्या.,मुंबई,
२८. व्यवस्थापकीय संचालक, खादी ग्रामोद्योग विकास महामंडळ मर्या.,मुंबई,
२९. सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण,
३०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,
३१. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
३२. सर्व प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
३३. सर्व कौशल्य  विकास अधिकारी,
३४. निवड नस्ती, सामासु.

# परिशिष्ट-अ

## तृतीयपंथीय घटकांसाठी बीज भांडवल योजनेंतर्गत अर्जाचा नमुना.

(अर्ज दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.)

फोटो

| | | |
|---|---|---|
| १. | तृतीयपंथीय अर्जदाराचे नांव | ----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>---------------------------------- |
| २. | वास्तव्याचा संपूर्ण पत्ता | ----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>---------------------------------- |
| ३. | दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ---------------------------------------- |
| ४. | जन्म दिनांक | दिनांक / / |
| ५. | ईमेल आयडी | ---------------------------------------- |
| ६. | शिक्षण | ----------------------------------------<br>---------------------------------------- |
| ७. | तृतीयपंथी असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे ओळखपत्र (सोबत प्रत जोडावी.) | क्रमांक----------------------------------<br>दिनांक-----------------------------------<br>जिल्हा----------------------------------- |
| ८. | वास्तव्याचा पुरावा. (दोन कागदपत्रे आवश्यक आहेत.)<br>आधर कार्ड असणे बंधनकारक राहील. | आधारकार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र / लाईट बील / घराची टॅक्स पावती |

| | | |
|---|---|---|
| ९. | वडील / आईचा व्यवसाय<br>(असल्यास नमूद करावा.) | ---------------------------------------<br>------------------------------------- |
| १०. | अर्जदाराच्या तथा वडील व आईच्या नावे असलेल्या मालमत्तेचा पूर्ण तपशिल (असल्यास)<br>राहते घर, शेती, व्यवसाय इत्यादी. | ---------------------------------------<br>---------------------------------------<br>---------------------------------------<br>---------------------------------------<br>------------------------------------ |
| ११. | नियोजित व्यवसायाचे नांव | ---------------------------------------<br>--------------------------------------- |
| १२. | प्रस्तावित व्यवसायाच्या ठिकाणाचा / जागेचा पत्ता | ---------------------------------------<br>---------------------------------------<br>--------------------------------------- |
| १३. | अर्जदार व्यवसायासाठी निवडलेली जागा/गाळा/दुकान स्वत:चे आहे किंवा भाड्याने घेतली आहे. | ---------------------------------------<br>---------------------------------------<br>---------------------------------------<br>--------------------------------------- |
| १४. | अर्जदाराने निवडलेल्या प्रकल्पासाठी करावयाची एकूण गुंतवणूक बाबनिहाय नमूद करावी. | १.------------------------------------<br>२.------------------------------------<br>३.------------------------------------<br>४.------------------------------------<br>५.------------------------------------<br>६------------------------------------ .<br>एकूण---------------------------------- |
| १५. | व्यवसायासाठी माल पुरवठा करणाऱ्याचे नांव व पत्ता | नांव----------------------------------<br>पत्ता----------------------------------<br>--------------------------------------- |
| १६. | एकूण भांडवलाची उभारणी<br>बँकेचे नांव व पत्ता | रुपये--------------------------------<br>बँकेचे नांव-----------------------------<br>पत्ता---------------------------------- |
| १७. | १. बँकेकडून कर्ज ५० टक्के<br>२. बीज भांडवलासाठी शासन अनुदान ४५ टक्के<br>३. लाभार्थी हिस्सा ५ टक्के | रुपये--------------------------------<br>रुपये--------------------------------<br>रुपये--------------------------------<br>एकूण---------------------------------- |

| | | |
|---|---|---|
| १८. | अर्जदाराच्या कुटूंबातील सर्व व्यक्तींची नांवे व्यवसाय /वय / (असल्यास) | -------------------------------------------<br>-------------------------------------------<br>-------------------------------------------<br>-------------------------------------------<br>-------------------------------------------<br>-------------------------------------------<br>------------------------------------------- |
| १९. | यापूर्वी अर्जदाराने किंवा कुटूंबातील व्यक्तींनी बँकेकडून व्यवसायासाठी कर्ज घेतले असल्यास त्याचा तपशिल नमूद करावा. | बँकेचे नांव---------------------------------<br>पत्ता---------------------------------------<br>-------------------------------------------<br>घेतलेली रक्कम रु.-------------------------<br>------------------------------------------- |
| २०. | अर्जदाराने वरील व्यवसायाशी संबंधीत विशेष प्रशिक्षण / अनुभव असल्यास त्याचा तपशिल नमूद करावा. | प्रशिक्षण घेतलेल्या संस्थेचे नांव-------------<br>-------------------------------------------<br>प्रशिक्षण कालावधी-------------------------<br>प्रशिक्षण घेतलेला कोर्स---------------------<br>------------------------------------------- |
| २१. | शेरा | -------------------------------------------<br>-------------------------------------------<br>-------------------------------------------<br>-------------------------------------------<br>------------------------------------------- |
| | मी प्रतिज्ञेवर जाहीर करतो/ करते की, वरील सर्व माहिती सत्य व बरोबर आहे. मला बीज भांडवल आणि बँकेचे कर्ज मंजूर झाल्यास त्याचा उपयोग मी वर नमूद केलेल्या व्यवसाय सुरु करण्यासाठीच करीन व बँकेचे कर्ज तथा तृतीयपंथीयांना बीज भांडवल योजनेंतर्गत प्राप्त कर्ज नियमाप्रमाणे परतफेड करीन. याबाबत कोणतीही अनियमितता झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन. | |
| | दिनांक / /२० | अर्जदाराची स्वाक्षरी<br><br>(नांव-----------------------------------) |

| * | **सोबत सादर करावयाची कागदपत्रे** |
|---|---|
| (१) | अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र |
| (२) | वयाचा पुरावा |
| (३) | अर्जदार तृतीयपंथी असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले ओळख प्रमाणपत्र |
| (४) | व्यवसायासाठी जागा भाडेतत्त्वावर घेतली असल्यास मालकाचे संमतीपत्र |
| (५) | वास्तव्याचा पुरावा म्हणून आधारकार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र / लाईट बील / घराची टॅक्स पावती |
| (६) | ओळखीचा पुरावा म्हणून रेशनकार्ड/ आधार कार्ड/ पॅनकार्ड ची झेरॉक्स प्रत. |
| (७) | वाहनासाठी वाहन चालक परवाना (असल्यास) |
| (८) | शपथपत्र रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवर सादर करणे आवश्यक आहे. |
| (९) | सक्षम प्राधिकरणाचे व्यवसाय करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र |

***

# परिशिष्ट-ब

## तृतीयपंथीय घटकांसाठी बीज भांडवल योजना

**(रुपये १००/- च्या स्टॅंप पेपरवर करावयाचा भाडे करारनामा)**

लिहून घेणार : नांव-----------------------------------------
वय--------------------------------------------
संपूर्ण पत्ता-------------------------------------

लिहून देणार : नांव-----------------------------------------
वय--------------------------------------------
संपूर्ण पत्ता-------------------------------------

कारणे भाडे करारनामा लिहून देतो की, माझ्या मालकी व ताब्यातील व नावावर असलेले मिळकत असलेली मोकळी जागा/ गाळा / दुकान -------------------------------- महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपरिषद/ गावातील हद्दीतील दुकान ज्याचे क्षेत्र---------------------चौरसफुट असून ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस------------------------------पश्चिमेस------------------------------
दक्षिणेस-----------------------------उत्तरेस------------------------------

याप्रमाणे वरील चतु:सिमेच्या आतील दुकान/गाळा/मोकळी जागा (मिळकत) मी तुम्हास प्रतिमहा भाडे रुपये -----------/- (अक्षरी रुपये----------------------- फक्त) या प्रमाणे दिनांक / /२० पासून दिनांक / /२० पर्यंत भाड्याने दिलेले आहे. त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. सदरील दुकान/गाळा/मोकळी जागा वर नमूद कालावधीसाठी भाड्याने दिलेली आहे. तसेच सदर दुकान/गाळा/मोकळी जागा इतर कोणालाही पोट भाड्याने देणार नाही.

२. सदरील दुकान/गाळा/मोकळी जागा बाबत कोणत्याही प्रकारची दुरुस्ती किंवा डागडुजी करणे असल्यास माझ्या परवानगीशिवाय करणार नाही.

३. विद्युत मिटरचे भाडे लिहून देणार हेच भरतील.

४. सदर कालावधीचा करारनामा संपल्यानंतर नवीन करारनामा करण्यात येईल.

करीता सबब, हा भाडे करारनामा मी माझ्या स्वत:च्या राजीमर्जीने कोणाच्याही दबावाला बळी न पडता लिहून देत आहे.

दिनांक / /२०
ठिकाण--------------

लिहून देणार
स्वाक्षरी---------------------------------

साक्षीदार (१)-----------------------------
साक्षीदार(२)-----------------------------

लिहून घेणार
स्वाक्षरी---------------------------------

साक्षीदार (१)-----------------------------
साक्षीदार(२)-----------------------------